# पाझर (Trickle)

Genre: Drama | Duration: 90 minutes | Story/Screenplay/Dialogue: Pralhad Jadhav

### One line:

धरणाखाली दूरवर असणाऱ्या एका डोहातील पाणी संपत आल्यामुळे आणि जे आहे ते दूषित झाल्याने त्यातील एका दुर्मिळ माशाला त्याचा जीव वाचवण्यासाठी धरणाच्या वर स्वच्छ पाण्यात नेऊन सोडण्याची धडपड करणाऱ्या एका शाळकरी मुलाच्या संघर्षाची कहाणी...

### Synopsis:

कोळसेवाडी हे महाराष्ट्राच्या एका सुदूर डोंगरी भागात कधीकाळी निसर्गसौंदर्यासाठी प्रसिद्ध असणारे गाव! घनदाट जंगल आणि बारमाही वाहणारी सावित्री हे त्याचे वैशिष्ट्य! पण आता 'डेव्हलपमेंट'च्या नावाखाली विद्रूप होत चाललेले गाव अशी त्याची नवी ओळख निर्माण होऊ लागली आहे.

सावित्रीवरील धरणाचे काम पूर्ण होत आले असून मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन होणार आहे. धरणामुळे विकासाला गती येईल अशी चर्चा आहे पण भूसंपादन, वृक्षतोड आणि निसर्गाची नासधूस यामुळे तेथील जैवविविधता धोक्यात आली आहे. आदिवासी, कातकरी, कुणबी अशा स्थानिक रहिवाशांची वाताहत झाली असून शासकीय यंत्रणा आपल्या बधीर आणि आत्मलुब्ध कारभारात मग्न आहे. गोरगरिबांकडे पाहायला, पर्यावरणाच्या प्रश्नांत लक्ष घालायला कुणालाही वेळ नाही.

हरी हा दहावीत शिकणारा मुलगा. आई-वडील मोलमजुरी करतात. आजी-आजोबा, वृद्धापकाळामुळे घरीच कसेबसे जीवन कंठत असतात. हरीच्या वडिलांनी 'खवल्या- मांजरा'ची शिकार केल्याच्या आरोपावरून पोलिसांनी त्याला पकडून नेले आहे. या अशा परिस्थितीमुळे हरी भांबावून गेला आहे. त्याचे अभ्यासातील लक्ष उडाले आहे. शाळेत जाणेही त्याने बंद केले आहे.

अशा परिस्थितीत हरी एकदा नदीवर गळाने मासेमारी  करीत असताना सरस्वती नावाच्या एका गूढ-रहस्यमय मुलीशी त्याची भेट होते. तेथील डोहात अडकलेल्या एका दुर्मिळ माशाला धरणाच्या वर स्वच्छ पाण्यात नेऊन सोडण्याची कामगिरी ती हरीवर सोपवते. पण या कामात कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, प्रशासकीय असे अनेक अडथळे त्याच्यासमोर उभे असतात. त्यांना तोंड देताना हरीचा आत्मविश्वास डळमळीत होतो. सावंतसर, त्याचे मित्र, आणि सरस्वती त्याला प्रोत्साहित करत असतात. एखादी अज्ञात शक्ती आपल्या मदतीला धावून येईल अशी

आशाही हरीच्या मनात असते. या चढ-उतारात हळूहळू त्याच्या जगण्याला नेमका सूर गवसतो आणि तो अधिक निर्धाराने कामाला लागतो.

**पुढे काय होते?**

हरी त्या माशाला सुरक्षितपणे धरणात नेऊन सोडतो की नाही? त्या कामात त्याला त्याच्या मित्रांची, सरांची, सरस्वतीची नेमकी कशी मदत होते? शासकीय यंत्रणा आणि नेतेमंडळी या प्रकरणी कोणती भूमिका घेतात? सरस्वतीचे रहस्य नेमके काय असते? खवले-मांजर शिकार-प्रकरणाचे पुढे काय होते? यासारख्या प्रश्नांचा वेध घेणारी; माणूस आणि निसर्ग यातील विविधांगी नात्याचे पदर तरलपणे उलगडवत माणसाच्या आश्वासक भविष्याचे शिखर उजळून काढणारी, जगभरातील साऱ्या प्रेक्षकांना आवडेल, दीर्घकाळ त्यांच्या स्मरणात राहील आणि त्यांना सदैव प्रेरणा देत राहील अशी, पूर्वी कधीही पडद्यावर न आलेली आगळी-वेगळी कहाणी— ‘पाझर’!

***

(ही कथा, पटकथा आणि संवाद ‘स्क्रीन रायटर्स असोसिएशनकडे’ नोंदण्यात आले असून सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत.
नोंदणीचा तपशील :
SWA Membership Number : 56663
Type of Creation : Screenplay
Title of Creation : Paazar
Date : Thursday 2023-01-26 17:34:13
Transa. ID : 1674734534-1005257895
Reference Number : 112777692274)

***